# "Recent Trends in Language, Literature, Physical Education, Social Sciences And Commerce"

**9th Feb., 2019**

**Special Issue of**
**Multidisciplinary One Day International Seminar**

**Organized by**

The Bhogawati Shikshan Prasarak Mandal's

# Bhogawati Mahavidyalaya, Kurukali.

A/P Kurukali , Tal Karveer Dist.Kolhapur

**<u>Editors</u>**


**Dr.D.A. Chougale**

**Prof. Sagar R. Chougule**

**Dr.Arun Chavan**



**Special Issue No.47**

**Published by**
**Aayushi International Interdisciplinary Research Journal**
ISSN 2349-638x
Peer Review and Indexed Journal
Impact Factor 5.707
Website :- www.aiirjournal.com



I/C Principal
Art's, Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur

| | | | |
|---|---|---|---|
| 85 | Dr. Mrs. Sunita Kale<br>Swati Suryakant Jawale | Effect Of Yoga And Pranayam Endurance On Bank Worker | 269 |
| 86 | Dr. Mrs. Sunita M.Kale<br>Miss. Jagtap tulasa Haribhau | Effects Of Suryanamaskara And Aasana On Strength Of Student | 272 |
| 87 | Dr.Mrs.Sunita M. Kale<br>Punam Vilas Yadav | Effects Of Suryanamaskara & Asana On Agility Of Players | 275 |
| 88 | Pravinkumar B. Lupane<br>Dr. Pratap Bhagwan Gaikwad | Challenges Before Indian Retail Industry | 278 |
| 89 | Dr. Pratap Bhagwan Gaikwad<br>Pravinkumar B. Lupane | Recent Trends in Indian Banking | 282 |
| 90 | Prof. Rupesh Lakshmanrao Deshmukh | Opportunities And Challenges For Banking Related With New Trends In Rural Parts Of Maharashtra State | 285 |
| 91 | Dr. Sandeep Kabir Dabhade | Bank Branch Expansion in India | 289 |
| 92 | प्रा. डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत | अलिप्ततावाद आणि भारतीय परराष्ट्र धोरणाची जडणघडण | 293 |
| 93 | डॉ. जयश्री गणपती कांबळे | 21 व्या शतकातील जगासमोरील आव्हाने | 296 |
| 94 | संजय बाळगोंडा खोत | शेतकरी आत्महत्या भारतासमोरील एक आव्हान | 298 |
| 95 | श्री. प्रविण चंद्रकांत कुंभार | शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोलीमधील मोबाईल आधारीत ग्रंथालयीन सेवा : एक अभ्यास | 302 |
| 96 | प्रा. राजश्री मनोहर बिसुरे | साठोत्तरी निवडक दलित नाटकातून आलेले श्रमप्रतिष्ठेचे चित्रण | 305 |
| 97 | श्री. रणजीत एकनाथ हसुरकर | महात्मा जोतीराव फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातील श्रम संस्कृतीचे चित्रण | 309 |
| 98 | प्रा. सविता सुर्यवंशी | 'ब–बळीचा' कादंबरीतील चित्रित झालेली ग्रामसंस्कृती | 311 |
| 99 | डॉ. मनोहर कोलासेकर | बखर वाङमय साधनावरून किल्ल्यांचे महत्व | 313 |
| 100 | डॉ.सुरेश एम.चव्हाण | ऐतिहासिक संशोधनाचे वास्तव : एक दृष्टिक्षेप | 318 |
| 101 | डॉ. निवासराव अधिकराव वरेकर | मराठ्यांच्या इतिहास लेखनातील डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांचे योगदान (1890–1962) | 320 |
| 102 | प्रा. एम. बी. थोरात | सबाल्टर्न इतिहासलेखन | 322 |
| 103 | प्रा.डॉ. सुभाष रामराव रगडे | उपेक्षितांच्या (Subaltern) इतिहासलेखनाची आवश्यकता | 326 |
| 104 | श्री. अंकुश रामचंद्र बनसोडे | भारतीय शेतीची उत्पादकता आणि हमीभाव संकल्पनेचा अभ्यास | 328 |
| 105 | डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते | भारतीय व महाराष्ट्रातील शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास | 331 |

# ऐतिहासिक संशोधनाचे वास्तव : एक दृष्टिक्षेप

**डॉ.सुरेश एम.चव्हाण**
इतिहास विभाग प्रमुख
कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज जि.कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

कोणतेही संशोधन हे मानवी प्रगतीचा आलेख दाखवणारे महत्त्वाचे माध्यम असते. त्यातही ऐतिहासिक संशोधन हे सर्व संशोधनामध्ये अधिक महत्त्वाचे आणि परिणामकार ठरते. कारण माणूस हा ऐतिहासिक संशोधनाचा केंद्रबिंदू असतो. म्हणजेच भूतकाळातील मानवी प्रगतीवर, हालचालीवर व बदलावर प्रकाश टाकणारे संशोधन म्हणून ऐतिहासीक संशोधनाचे महत्त्व असते शिवाय ऐतिहासीक संशोधन हे सत्यावर आधारित असणारे किंवा सत्याच्या आधिकाधिक जवळ जाणारे असते. पण हे संशोधन करणे म्हणजे मोठे अग्नीदिव्यच असते कारण ऐतिहासीक संशोधन ज्या प्रक्रियेतून केले जाते. त्या प्रक्रियेत इतिहास संशोधकाला विविध प्रश्नांना तोंड दयावे लागते. जसे की, विषयाच्या निवडीपासून ते संशोधनाच्या आराखडयापर्यंत आणि त्यासाठी वापरलेल्या संदर्भसाहित्यापासून ते त्याच्या विश्लेषणापर्यंत अशा अनेकविध आव्हाणांना सामोरे जावे लागते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधनाच्या वास्तवतेवर एक संक्षिप्त दृष्टीक्षेप टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

**ऐतिहासीक संशोधन पध्दती –**

कोणत्याही संशोधनापेक्षा ऐतिहासीक संशोधन पध्दती अधिक कठीण (ताठर) असते कारण *छव क्वबनउमदज दव भ्पेजवतल* (संदर्भसाधन नाही तर इतिहास नाही ) हे ऐतिहासिक संशोधनाचे मुख्य तत्व मानले जाते. शिवाय इतिहास संशोधनात असत्याला थारा नसतो. म्हणून ऐतिहासिक संशोधनाचे महत्त्व हे त्यासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भसाधनांवर अवलंबून असते. ऐतिहासीक संशोधन प्रक्रिया ही विविध टप्प्यायातून जात असते. जसे की, विषयाची निवड, संशोधनाचा आराखडा, संदर्भसाहित्य संकलन , संदर्भसाधनांचे परीक्षण, अन्वयार्थ, कालनिर्णय,सादरीकरण, संदर्भसूची इत्यादी. याशिवाय इतिहास संशोधनात समाजशास्त्रीय विश्लेषनात्मक संशोधन पध्द्ती, तुलनात्मक अभ्यास पध्दती, सर्वेक्षण पध्दती, मुलाखती, प्रश्नावली यासारख्या तंत्रांचाही वापर करावा लागत असतो.

**ऐतिहासिक संशोधनात येणारे अडथळे –**

प्रत्येक इतिहास संशोधकास निवडलेले ऐतिहासिक संशोधन पूर्ण करण्यासाठी अनेकविध आडथळे पार करावे लागतात. त्यापैकी महत्त्वाचे अडथळे पुढील प्रमाणे –

**१) पूर्णतः वुस्तुनिष्ठ संशोधनातील मर्यादा –**

पूर्णतः वस्तुनिष्ठ इतिहास संशोधनाच्या अनुषंगाने विचार करताना हेन्री जॉन्सन या इतिहासकाराने इतिहासावर भाश्य करताना असे म्हटंले आहे की, भूतकाळात जे घडले आहे ते आहे तसेच सांगणे म्हणजेच इतिहास होय, पण ही संकल्पना प्रत्यक्ष इतिहास संषोधनात येताना दिसत नाही. विज्ञानामधील षंभर टक्के वस्तुनिश्ठता इतिहास संषोधनात आणता येत नाही, त्याची वेगवेगळी कारणे आहेत. जसे की, विज्ञानाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू हा निसर्ग आहे तर इतिहासाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदु हा माणूस आहे. षिवाय इतिहास संषोधकावर एखाद्या धर्माचा, कोणत्यातरी जातीचा, कोणत्यातरी पंथाचा, कोणत्यातरी देषाचा, कोणत्यातरी पक्षाचा, कोणत्यातरी विचार प्रवाहचा, कोणत्या तरी व्यक्तीचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे प्रत्यक्ष इतिहास लेखन करताना त्याच्या सत्य लिखानाला किंवा वस्तुनिश्ठतेला मर्यादा येते. याचाच परिणाम म्हणून इतिहासातील एकच घटना/ प्रसंगाबद्दल मतभिन्नता दिसून येते.

**२)संदर्भ साधनांचे संकलन –**

*छव क्वबनउमदज दव भ्पेजवतल* (कागदपत्र नाही तर इतिहास नाही,)या तत्वानुसार कागद पत्रांशिवाय इतिहास लिहिता येत नाही आणि लिहीला तर तो शात्रशुध्द असत नाही. त्यामुळे इतिहास संशोधनात संदर्भ साधनांचे महत्व अनन्य साधारण आहे. पण ही संदर्भसाधने संकलित करत आसताना संशोधकाला असंख्य समस्यांना तोंड दयावे लागते. संशोधकाला निवडलेल्या विषयाच्या अनुशंघाने संदर्भसाधनांचे संकलन करावे लागते. या सदर्भात स्वतः शोधनिबंध लेखकाला आलेला प्रत्यक्ष अनुभव प्रकट करावासा वाटतो. जे.एन.यू विद्यापीठ दिल्ली येथील ख्यातनाम इतिहास संशोधक प्रा. डॉ. उमेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मी,जत संस्थानचा प्रशासकिय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अभ्यास (१६८६ –१९४८) या विषयावर पीएच.डी.चे संशोधन करत आसताना संदर्भ साधनांच्या संकलना संदर्भात अनेक बरेवाईट अनुभव आले. एक तर विषयाचा कालखंड हा ४०० वर्षापूर्वीचा असल्याने समकालीन संदर्भसाधने मिळवणे अत्यंत कठिण होते. त्यातच इतर संस्थानाप्रमाणेच जत संस्थानाचे खाजगी स्वरूपात जतन करून ठेवण्यात आलेला दप्तरखाना हे माझ्या संशोधनाचा मुख्य आधार होता. पण संस्थानचे विद्यमान वारस यांनी सहकार्याची भूमिका घेतली नाही त्यामुळे संशोधक या नात्याने जत संस्थानच्या पराक्रम व कर्तबगारीचा समृध्द वारसा जपत दिमाखात उभा असणारा रामविलास पॅलेस (जतचा राजवाडा ) पहाण्याची, निरिक्षण करण्याची व तेथिल दप्तरखाना धुंडाळण्याची माझी मनोमन इच्छा पूर्ण होवू शकली नाही. या शिवाय संस्थान काळात विविध पदावर काम करणाऱ्या सावंत, शिंदे ,

महाडिक,भोसले,नाईक, पाटील, माने, प्रधान, बोर्गीकर, आरळी, इत्यादी घराण्याचा वारसांनी त्यांच्याकडे उपलब्ध असणारी संदर्भसाधने (पदव्या, पत्रव्यवहार, नाणी, मानपत्रे, वस्तु, फोटो, पुस्तके, अहवाल) संशोधनासाठी वापरण्यास असमर्थता दर्शवली. परीणामी संशोधक या नात्याने मला वस्तुनिष्ठ इतिहासापर्यंत पोहचता आले नाही.

**३)शासकीय कार्यालये स्वअनुभव -**

शासकीय कार्यालये, वस्तुसंग्रहालये व पुराभिलेखागार ही ऐतिहासिक संशोधनाची मूलभूत माहिती देणारी दालने आसतात. संशोधकांना तेथिल जुना दस्ताऐवज उपलब्ध करून देणे हे त्यांचे आदयकर्तव्य असते पण वास्तव चित्र वेगळेच असते. मी स्वतः मुंबई, पुणे, विजापूर, कोल्हापूर, आणि दिल्ली येथिल पुराभिलेखागारांना भेटी दिल्या. पण असंख्य संदर्भ साधने आसतानाही ती शोधून संशोधनकांना उपलब्ध करून देण्याची खरी मानसिकता येथिल बहुतांशी कर्मचाऱ्यांची नसते. उडवा -उडवीची उत्तरे दिली जातात. याशिवाय जुन्या वाचनालयांचे उंबरे झिजवत आसताना वाचनालयामध्ये आसणाऱ्या अणुक्रम किंवा सूची मध्ये दाखवलेली संदर्भसाधने प्रत्यक्ष कपाटामध्ये त्या जागेवर नसल्याचेच बऱ्याचदा अनुभवायला मिळाले.

**४) अधुनिक संदर्भसाधनांची मर्यादा -**

अलिकडच्या कालखंडाला विज्ञानाचे युग असेही म्हणतात कारण विज्ञानाच्या विविध संशोधनामुळे मानवी जीवनात एक प्रकारची क्रांती घडून आलेली दिसून येते. यास संदर्भसाहित्याचे क्षेत्रही अपवाद ठरले नाही. इंटरनेट, कॉम्प्युटर, झेरॉक्स, व्हिडीओ रेकॉर्डीग, शुंटींग, फोटोग्राफी, वेबसाईट, वॉटसअप, यासारख्या माध्यमातून आपणास पाहिजे त्या विशयाची चटकन माहिती मिळणे सोपे झाले आहे. पण ऐतिहासीक संशोधनाच्या अनुशंघाने याकडे पहात आसताना या संदर्भ साधनांवर किती विश्वास ठेवायचा हा एक प्रश्न पडतो. अशा संदर्भसाधनांचा वापर करताना संशोधकाला आतिशय दक्ष राहून कागदपत्रांची सत्यता पडताळून त्यांची विश्वासहर्ता ठरवून वापरता येवू शकतात. असे असले तरी ही माहिती शास्त्रशुध्द तथा वस्तुनिश्ठ इतिहासलेखनाची अंतरिम साधने होवू शकत नाहीत. कारण ही संदर्भ साधने प्रत्येकाने स्वतःच्या दृष्टीकोनातून मांडलेली असतात.

**५) ऐतिहासिक संशोधनातील संशोधकाची भूमिका -**

ऐतिहासिक संशोधनात इतिहास सशोधकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.कारण संशोधकाचे व्यक्तीमत्व कशा प्रकारचे आहे यावर त्याने केलेल्या संशोधनाचा दर्जा अवलंबून असतो. इतिहासातील मूलभूत संकल्पना, वाचन, भाशांचे ज्ञान, कष्टाची तयारी, संयम, चारित्र्य, प्रामाणिकपणा, नैतिकता आणि नम्रता हे इतिहास संशोधकासाठी आवष्यक असणारे गुण आहेत. पण हे सर्व गुण सर्वच इतिहस संषोधकाजवळ असतीलच असे नाही.या संदर्भात 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' ही म्हण लागू होते. म्हणजेच शास्त्रशुध्द /वस्तुनिष्ठ ऐतिहासिक संषोधनासाठी अत्यावष्यक असणारे हे गुण संषोधकाजवळ नसणे हे इतिहास संषोधनातील फार मोठे आव्हान आहे.

**समारोप -**

ऐतिहासीक संशोधन हे मूळातच मानवी प्रवृत्तीवर अवलंबून असल्याने एकाच विषयावरील संशोधनात तफावत आढळते. ऐतिहासीक संशोधनाच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मानव, समाज व व्यवस्था निर्मित अडथळयांबरोबरच नकारात्मक मानसिकता,स्वार्थी दृष्टीकोन, असहकार्याची प्रवृत्ती यासारख्या गोष्टीही आव्हान उभं करतात हे वास्तव चित्र आहे. अनेक संशोधकांना वरील समस्यांमुळे आपले संशोधन अर्ध्यावरच सोडून दयावे लागते हेही तितकेच सत्य आहे. *सरकारी काम बारा महिने थांब* या सारख्या म्हणींचा पावला पावलावर प्रत्यय येतो. त्यामुळे इतिहास संशोधकाला गृहीत असलेली इतिहासाची शास्त्रशुध्द मांडणी करता येत नाही. या संदर्भात स्वतः लेखकाने ९ ऑगष्ट क्रांतीदिनाचे औचित्य साधून भडगांव येथील ऐतिहासिक देसाई वाडयास विद्यार्थ्यांसह भेट दिली. पण विश्वसनीय ऐतिहासिक माहिती मिळू शकली नाही हे सत्य नाकारता येत नाही. पण असे असले तरी इतिहास संशोधकाने खचून न जाता येणाऱ्या प्रत्येक समस्येवर कौशल्याने मात करून आपले संशोधन अधिकाधिक वस्तुनिष्ठ आणि परिपूर्ण करण्याचा नहेमीच प्रयत्न केला पाहिजे.

**संदर्भग्रंथ सूची -**


१) एस.एम.चव्हाण ,'जत संस्थानाचा प्रशासकीय,सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक अभ्यास(१६८६–१९४८) अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे-२०१५.

२) स. मा. गर्गे, इतिहासाची साधने एक शोधयात्रा, सन १९९५

३) इ. एच. कार, इतिहास म्हणजे काय? कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे,१९९४

४) शांता कोठेकर ,'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन ,नागपूर २००७

५) करंदीकर - मंगरूळकर, इतिहास आशय अध्यायन पध्दत, फडके प्रकाशन कोल्हापूर २०११

६) इतिहास संशोधकांचे संशोधन कार्यातील प्रत्यक्ष अनुभव.

7) K.N. Chitnis, Research Methodology of History

8 K.L. Khurana, Concept & Method of Historiography,Lakshimenaryan publication, Agra, 2010

9) मुलाखत : भडगावचा ऐतिहासिक वाडा (व्यवस्थापक भोखर हिरेमठ,भडगांव) दिनांक 09/08/2018

10) Field work (प्रत्यक्ष सर्वेक्षण )


I/C Principal
Art's, Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur.